<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५/२०१८</u>
<u>अर्जदारतर्फे मुखत्यार सा.क्र.१</u>
<u>निशाणी क्र. ३६</u>

शपथेवर पुढे सुरु –

<u>अर्जदारतर्फे विधीज्ञ फिरोज खान यांच्यामार्फत सरतपास दुपारी ०१.३२ वा. सुरुः</u>–

१. आज रोजी नि.क्र.३६ वर माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केलेली आहे, सदर प्रकरणातील अर्जदार नामे नबीला ही माझी सख्खी बहिण असून सदर प्रकरण चालविण्यासाठी मला कुल मुखत्यारपत्र दिलेले असून त्याची साक्षांकित प्रत अभिलेखावर नि.क्र.३४ नुसार दाखल केलेली आहे. त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून माझ्या बहिणीने लिहून देणार म्हणून सही केलेली असून मी स्वतः लिहून घेणार म्हणून सही केलेली आहे. सदर कुल मुखत्यारपत्राचा मुळ दस्त साक्षीदाराने सोबत आणलेला आहे तसेच अभिलेखावर दाखल असलेली प्रत ही व्हेरीफाईड करुन दाखल केलेली आहे. सबब, त्यास नि.क्र. देण्याची विनंती अर्जदार यांच्या विधीज्ञांनी केलेली आहे. <u>यावर गैरअर्जदार / हरकतदार यांच्या विधीज्ञांनी अशी हरकत घेतली की</u>, मुळ कुल मुखत्यारपत्र दस्त सोबत आणलेला असूनही न्यायालयाचे अभिलेखावर दाखल केलेला नाही, त्यामुळे त्यास नि.क्र. देण्यात येवू नये. <u>यावर अर्जदाराच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की</u>, सदर कुल मुखत्यारपत्र न्यायालय क्र.२ मध्ये चालू असलेल्या नि.दि.दा. क्र.१०/२०२१ आणि प्रस्तुत दि.किर.अर्ज. क्र.२५/२०१८ ही दोन प्रकरणे चालविण्याकरीता दिलेले असल्यामुळे मुळ कुल मुखत्यार दस्त नि.दि.दा.क्र.१०/२०२१ या प्रकरणामध्ये दाखल करावयाचा आहे. सबब, त्यास नि.क्र. देण्यात यावे.

<u>**आदेशः**</u>– मुळ दस्त सोबत आणलेला असून त्याची व्हेरीफाईड प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे तसेच सदर कुल मुखत्यार दस्त्यामध्ये नमुद केलेली दोन्ही प्रकरणे न्यायालय क्र.२ मध्ये प्रलंबित असल्यामुळे अर्जदार यांच्या विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद रास्त दिसून येत आहे. सबब कुल मुखत्यारपत्र दस्तास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे.

२. यादी नि.क्र.१८ सोबत काही कागदपत्रे सादर केलेली आहेत. यादी नि.क्र.१८/१ वर दै. अकोला दर्शन या वृत्तपत्राची दि.१६.०४.२०१८ रोजीची प्रत सादर केलेली असून त्या वृत्तपत्रामध्ये सदर प्रकरणाची जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात आलेली आहे. त्यास यापुर्वीच

नि.क्र.१९ देण्यात आलेला आहे. नि.क्र.१८/२ वर मो. नदीम मो. इब्राहीम यांचे दि.१७.११.२०१७ रोजीचे मृत्यु प्रमाणपत्र सादर केलेले असून त्यास यापुर्वीच नि.क्र.२० देण्यात आलेला आहे.

मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे सरतपास दुपारी ०१.५० वा. तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांक : ०५.०२.२०२५.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

मध्यान्हानंतर पुढील सरतपास सायंकाळी ०५.२७ वाजता शपथेवर पुढे सुरु करण्यात येत आहे.

३. यादी नि.क्र.४० सोबत दोन आधार कार्डांच्या प्रती सादर केलेल्या आहेत. नि.क्र.४०/१ वर अर्जदार नामे नबीला फिरदोस मो. नदीम यांच्या आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत दाखल केलेली असून मुळ आधारकार्ड सोबत आणलेले आहे. हरकतदार यांच्या विधीज्ञांनी केवळ अर्जदार यांनी स्वतः न्यायालयात हजर होवून आधारकार्ड दाखल करणे होते, अशी हरकत घेतली. परंतु साक्षीदाराकडे मुखत्यारपत्र उपलब्ध असल्यामुळे सदर प्रतिस **नि.क्र.४१** देण्यात येत आहे.

४. यादी नि.क्र.४०/२ वर कुल मुखत्यार धारक यांच्या आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत सादर केली असून मुळ आधारकार्ड सुध्दा सोबत आणलेले आहे. त्यास **नि.क्र.४२** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

**हरकतदार यांच्यामार्फत विधीज्ञ हमीद शेख यांच्यामार्फत उलटतपासः**

हरकत यांचे विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास सायंकाळी ०५. ३५ वा. पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांकः– ०५.०२.२०२५**

**समक्ष**

**(विष्णु द. गिते)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

VISHNU DATTARAO GITE
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.02.05 17:35:09 +0530

**(विष्णु द. गिते)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०५/०२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०५/०२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०५/०२/२०२५ |